बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २६ जानेवारी २०२४**

---

## दि. २६ जानेवारी २०२४ प्रजासत्ताक दिन

पोलीस विभागाकडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी त्यांचे सेवाकालावधीत बजावलेल्या उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगिरीबद्दल दरवर्षी सन्मानार्थ मा. राष्ट्रपती, भारत सरकार यांचेकडुन उत्कृष्ट व विशेष पदक आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येत असते.

दि. २६/०१/२०२४ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त, पोलीस मुख्यालय, सोलापूर शहर येथे मा. ना चंद्रकांत पाटील, पालकमंत्री सोलापूर, यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.

मा. ना चंद्रकांत पाटील, पालकमंत्री सोलापूर, यांचे हस्ते पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर आस्थापनेवर कार्यरत असलेले राष्ट्रपती पदक प्राप्त, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुनिल भिवाजी दोरगे, नेम- गुन्हे शाखा, व महिला सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक- सिमा आप्पाशा डोंगरीतोट, नेम- विशेष शाखा, यांना पुष्पगुच्छ व प्रशस्तीप्रत्रक देवून गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रम प्रसंगी, मा. श्री. कुमार आशिर्वाद, जिल्हाधिकारी, सोलापूर, मा. डॉ. राजेंद्र माने, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, मा. श्रीमती शितल तेली-उगले, म.न.पा आयुक्त, सोलापूर, मा. श्रीमती मनिषा आव्हाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, सोलापूर, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामिण, मा. श्रीमती वैशाली कडुकर, प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, केगाव, सोलापूर, मा. श्री. विजयकुमार चव्हाण, समादेशक, रा.रा. पोलीस बल गट क्रं. १०, सोलापूर, तसेच इतर पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी व नागरीक उपस्थित होते.